सोबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था, प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास मान्यता न देणेबाबत संस्थांना अवगत करणेबाबतचे पत्र क्रमांक २/एनजीसी/फार्मसी अभ्यासक्रम-संस्था मान्यता/२०२४/१०७ दिनांक २८/२/२०२४ रोजीचे पत्र सोबत जोडलेले असून माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

पृष्ठांकन क्र: तंशिविकाअ/शिक्षण/२०२४/ 508
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दिनांक. 28 FEB 2024

प्रति,

प्राचार्य, सर्व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

सहाय्यक संचालक (तांत्रिक)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती.

प्रत :- **प्रोग्रामर**, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

Endos

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४९२/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2 @dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

तात्काळ/ई ऑफिस प्रणालीद्वारे

क्रमांक: २/एनजीसी/फार्मसी अभ्यासक्रम_संस्था मान्यता/२०२४ १०७ दिनांक : 28 FEB 2024

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,छत्रपती संभाजीनगर,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था, प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास मान्यता न देणेबाबत संस्थांना अवगत करणेबाबत.....

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक २/एनजीसी/२०२४/९९,दिनांक २३.२.२०२४

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांची शिखर संस्था असलेल्या फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांनी दिनांक १२.२.२०२४ रोजी शासनास कळविल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था, प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास मान्यता न देणेबाबत शासनाने संचालनालयास दिनांक २२.२.२०२४ रोजी कळविले आहे. त्यानुसार संदर्भाधीन पत्रान्वये आपल्या कार्यालयास प्राप्त झालेल्या तसेच यापुढे प्राप्त होणा-या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था, प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येऊ नये असे कळविलेले आहे.

दरम्यानच्या कालावधीत ज्या विभागीय कार्यालयांनी संचालनालयास वरीलबाबतचे प्रस्ताव सादर केले आहेत तसेच ज्या संस्था यापुढे प्रस्ताव सादर करतील अशा सर्व संस्थांना उपरोक्त बाब आपल्या स्तरावरुन अवगत करण्यात यावी. तसेच विभागीय कार्यालयांकडे प्राप्त झालेले औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था, प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास मान्यतेबाबतचे प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात येऊ नयेत.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : कार्यासन क्रमांक १०,मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहितीसाठी

F:\BUDAGE\2024-25\Pharmacy\Letter to RO for inform institutes regarding no permission.docx

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२०४०९३५
Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्रमांक : HTED-13033/2/2023-MHT-(TE-4) दिनांक: २२ फेब्रुवारी, २०२४.

प्रति,

संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास मान्यता न देण्याबाबत..

संदर्भ:- आपले पत्र क्र.२/एनजीसी/फार्मसी नवीन संस्था-अभ्यासक्रम मान्यता/२०२४/७५, दि.१३.०२.२०२४.

उपरोक्त संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाराष्ट्र राज्यात औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास परवानगी देण्यात येऊ नये, तसेच, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाराष्ट्र राज्यात औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच, नवीन अभ्यासक्रमास संलग्नीकरण न देण्याबाबत विद्यापीठांना सूचना देण्यात याव्यात, असे फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दि.१२.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सबब, फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाचे निर्देश विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांसदर्भात विभागीय कार्यालयाकडून आतापर्यंत प्राप्त झालेल्या तसेच, यापुढे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येऊ नये.

तसेच, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी कळविल्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास संलग्नीकरण न देण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधित विद्यापीठांना कळविण्यात यावे.

(शहाजहान मुलाणी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

श्री म. संध्या / श्री. दिनेश.

प्रत:- निवडनस्ती (तांशि-४)

Scanned with ACE Scanner